# राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
## परिचलन पध्दतीने मान्यतेसाठी बाब

**विषय :-** **महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम, २०१७ च्या नियम ५(६) अंतर्गत इलेक्ट्रिक वाहनांचे पॉवर रेटींग निश्चित करण्याबाबत प्रस्ताव.**

महाराष्ट्र शासनाने दिनांक ०४.०३.२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे "महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम, २०१७" प्रसिध्द केले आहेत. सदर नियमातील नियम ५ (६) अन्वये सदर योजनेत चालणारे कोणतेही वाहन स्वच्छ इंधनावर (Petrol, CNG, LPG वा हायब्रीड/विद्युत उर्जेवर) चालणारे असावे. तसेच, विद्युत उर्जेवर चालणाऱ्या वाहनांबद्दलचे पॉवर रेटिंग राज्य परिवहन प्राधिकरणाकडून निर्धारीत करण्याबाबत सदर नियमात नमुद करण्यात आले आहे..

राज्य शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ११९ मध्ये अधिसूचना क्र. ०३१०/ ८८७/ प्र.क्र.१८२/ परि-२ दिनांक १३.०९.२०१० अन्वंये सुधारणा करुन मिटर्ड टॅक्सी, पर्यटक कॅब, लक्झरी कॅब, जीप टाईप कॅब व मॅक्सी कॅब या संवर्गात नोंदणी करावयाच्या वाहनांची इंजीन क्षमता ९८० सीसी पेक्षा अधिक असण्याची तरतूद केली आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ चा नियम ११९ मध्ये बॅटरीवर चालणा-या वाहनांचा, तेव्हा या प्रकारची वाहने उपलब्ध नसल्याने अंतर्भाव करण्यात आलेला नाही. तथापी, या बाबतचा प्रस्ताव शासनास स्वतंत्रपणे सादर करण्यात आला आहे.

महिंद्रा कंपनीने उत्पादीत केलेल्या रेवा या बॅटरी संचलित चार चाकी चार आसनी (3+1) वाहनांच्या वापरास अखील भारतीय कंत्राटी परवान्यासाठी सार्वजनिक सेवा वाहन म्हणून महाराष्ट्र राज्यात नोंदणी करण्यास मान्यता देण्याची बाब राज्य परिवहन प्राधिकरणाच्या दिनांक १८.०१.२०१४ रोजीच्या बैठकित विचारार्थ सादर करण्यात आली होती.

सदर बैठकित राज्य परिवहन प्राधिकरणाने बॅटरी संचलित वाहनांना राज्यात सार्वजनिक सेवा वाहन म्हणून नोंदणी करण्यास मान्यता देण्यापूर्वी, महाराष्ट्र मोटार वाहन नियमामध्ये विहित केलेली किमान ९८० सी.सी. इंजिनक्षेतेची मर्यादा व विषयांकित वाहनांची इंजिन पॉवर 31kw@ 3750 rpm व 19kw@ 3750 rpm यांच्या समतुल्यते बाबत (equivalence) ए.आर.ए.आय. पूणे या संस्थेकडून अभिप्राय मागविण्याचा तसेच अर्जदार कंपनीकडून बॅटरी चार्ज करण्याच्या स्टेशन्सबाबत अधिक माहिती मागवुन बॅटरी संचालीत वाहनांना राज्यात सार्वजनिक सेवा वाहन म्हणुन नोंदणी करण्यास मान्यता देण्याची बाब राज्य परिवहन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करण्याचा निर्णय टराव क्र.०१/२०१४ अन्वये घेतला.

प्राधिकरणाच्या निर्देशानुसार एआरएआय, पुणे यांचेकडून दिनांक १७.०२.२०१४ च्या पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आले. त्याप्रमाणे एआरएआय, पुणे यांनी दिनांक १३.०३.२०१४ चे पत्रान्वये इलेक्ट्रीक वाहन व इंधनावर चालणारे वाहन यांच्या शक्तीची थेट तुलना करणे अवघड असल्याचे, तसेच इलेक्ट्रीक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी सकल भार क्षमता, आसन क्षमता इत्यादी मानकांच्या आधारे मान्यता देण्याचा विचार करावा असे अभिप्राय दिले.

तसेच महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम, २०१७ अंतर्गत ९८० सीसी व १४०० सीसी वाहनांना वेगवेगळे परवाना शुल्क विहित केले असल्याने सदर इंजिन क्षमतेच्या समकक्ष इलेक्ट्रिक वाहनांची क्षमता काय असावी याबाबत एआरएआय, पुणे यांचेकडुन अभिप्राय मागविण्यात आले. एआरएआय पुणे यांचे दिनांक ०९.०५.२०१७ चे पत्रान्वये प्राप्त अभिप्राय सोबत जोडले आहेत. सदर अभिप्राय विचारात घेता पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येते.

१. इलेक्ट्रिक वाहनासाठी पॉवर रेटींग निर्धारीत न करता, ज्या इलेक्ट्रिक वाहनास केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १२६ मध्ये नमुद तपासणी संस्थेने ९८० सी.सी. पेक्षा कमी नाही अशी समकक्षता दिली आहे त्या वाहनांना महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम २०१७ मधील तरतुदीनुसार नोंदणी



Scanned with CamScanner

करण्यास मान्यता द्यावी. तसेच ज्या वाहनांना १४०० सी.सी. पेक्षा जास्त अशी समकक्षता दिली आहे त्यांना नियम ५ (२) मधील तरतुदीनुसार किमान ३०% वाहनांची गणना करण्यासाठी गृहीत धरण्यात येईल. याकरीता कलम १२६ मध्ये नमुद संस्थेचे प्रमाणपत्र अथवा अहवाल गृहीत धरण्यात येईल.

२. वाहनाची आसनक्षमता ३ अधिक १ किंवा त्यापेक्षा जास्त परंतु ६ अधिक १ पेक्षा कमी असावी.

३. केवळ हार्डटॉप व बंदबॉडी असणा-या वाहनांचा समावेश असावा.

४. प्रवाशांचे सामान ठेवण्यासाठी पुरेशी जागा असावी.

५. इलेक्ट्रीक वाहनांचे भाडेदर सुत्र मा. बि.सी खटुआ यांच्या अध्यक्षतेखालील चार सदस्यीय समितीमार्फत निश्चित करावे.

**ठराव**

राज्य परिवहन प्राधिकरणाने उपरोक्त टिपणीचे अवलोकन करुन प्रस्तावित बाब क्रमांक १ ते ५ यास मान्यता दिली.

**ठराव क्रमांक ०२/२०१७**

**स.बा.सहस्त्रबुध्दे** 12/05/17
**सचिव,**
**राज्य परिवहन प्राधिकरण तथा**
**अपर परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**डॉ. प्रवीण गेडाम,**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण तथा,**
**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. आर.के.पद्मनाभन**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण तथा**
**अपर पोलीस महासंचालक (वाहतूक),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. मनोज सौनिक**
**अध्यक्ष,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा प्रधान सचिव, गृह विभाग (परिवहन),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

12/5/17

Scanned with CamScanner